सकाळ

# महिला सक्षम ; पण मार्गदर्शनाची गरज

## मोनिका खन्ना : 'रवळनाथ'तर्फे महिला सहकार स्नेहमेळावा

■ **सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १७ : महिला सशक्तीकरण चळवळीचा प्रचार, प्रसार सर्वत्र सुरू आहे; परंतु मुळातच महिला सक्षम आहेत. गरज आहे ती फक्त त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याची. त्याची जबाबदारी रवळनाथ संस्था पार पाडत आहे. संस्थेचे हे कार्य नक्कीच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन दिल्लीतील केंद्रीय निबंधक कार्यालयाच्या सहनिबंधक मोनिका खन्ना यांनी केले.




गडहिंग्लज : रवळनाथमध्ये आयोजित महिला स्नेहमेळाव्यात मोनिका खन्ना व डॉ. कपिल खन्ना यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी एम. एल. चौगुले, मीना रिंगणे, उत्कर्षा पोतदार, डी. के. मायदेव आदी उपस्थित होते.

येथील श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी, महालक्ष्मी वुमेन्स को-ऑप क्रेडिट सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने ७१ व्या अखिल भारतीय सहकार सप्ताहनिमित्त महिलांसाठी आयोजित सहकार स्नेहमेळाव्यात त्या बोलत होत्या. हृदयरोगतज्ज्ञ डॉ. कपिल खन्ना यांची प्रमुख उपस्थिती होती. रवळनाथ संस्था समूहाचे प्रमुख एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते.

खन्ना म्हणाल्या, 'रवळनाथ सहकार क्षेत्रातील एक मार्गदर्शक संस्था आहे. सहकार क्षेत्राच्या वृद्धीसाठी अशा संस्था इतरांना प्रेरणा देतात. त्यामुळे रवळनाथच्या यशस्वी वाटचालीचे हिंदी, इंग्रजी भाषेत पुस्तक प्रकाशन व्हावे. सहकाराची मूलतत्त्वे जपल्यास एखादी संस्था कशी प्रगती करते, याचा या पुस्तकाद्वारे देशभर प्रसार होईल.

रवळनाथचे सीईओ डी. के. मायदेव यांनी स्वागत केले. उपाध्यक्षा मीना रिंगणे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संजीवनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. संचालिका रेखा पोतदार यांनी आभार मानले. महालक्ष्मीच्या अध्यक्षा उत्कर्षा पोतदार, उपाध्यक्षा प्राची मायदेव आदी उपस्थित होते.

Kolhapur, Kopjillha
18/11/2024 Page No. 7